Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-III MAR. 2017

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

गोविंदाग्रजांची कविता

प्रा. संजय जनार्दन आगलावे
सहाय्यक प्राध्यापक
जे. डी. पाटील सांगळूदकर महा., दर्यापूर
ई -मेल - aglawesanjaysir@gmail.com

अर्वाचिन मराठी काव्याचा विचार करतांना राम गणेश गडकरी म्हणजेच गोविंदाग्रज हे महत्वाचे कवी आहेत. त्यांचा जन्म इ.स. १८८५ झला तर मृत्यू १९२० साली झला. हा कालखंड अर्वाचीन मराठी काव्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत मानले जातात. गोविंदाग्रज स्वत:ला केशवसुतांचा सच्चे चेले मानतात, असे असले तरी त्यांच्या प्रभावात न राहता त्यांनी आपल्या वैशिष्टयपूर्ण कवितेतून मराठी साहित्य विश्वात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यांनी राम गणेश गडकरी या नावाने नाटयलेखन केले, बाळकराम या नावाने विनोदी लेखन केले. गोविंदग्रज या नावांने काव्यलेखन केले. काव्यलेख्न करतांना त्यांच्या प्रतिभेने उत्तुंगता व उत्कटता गाठलेली दिसते, त्यांचे भाषाप्रभुत्त त्यांच्या कवितेतून नेहमी जाणवते, "वाग्वैजयती" हा त्यांच्या काव्यसंग्रह याची साक्ष देते. डॉ. रा. शा. वाळिंबे यांनी त्यांना शब्दसृष्टीचे ईश्वर मानलेले आहे. विपुल शब्दभंडार हे त्यांचे बलस्थान आहे. त्यांच्या अनेक कवितांनी रसिक वाचकांच्या हृदयात स्थान मिळवलेले आहे. राजहंस माझ निजला, दसरा, अल्लड प्रेमास, मुरली, घुबडास, स्मशानातले गाणे्, गुलाबी कोडे, प्रेम आणि मरण, कृष्णाकाठी कुंडल, निर्दय बालेस, चिंतातुर जंतु

"दसरा" ही गोविदाग्रजाची वैशिष्टपूर्ण कविता आहे, या कवितेवर केसवसुतांच्या तुतारी या कवितेचा प्रभाव आहे. वाईट रूढींच्या परंपरांच्या पुढे गेले पाहिले दसरा म्हणजे सिमोल्लंघन या कवितेत फारसे नावीण्य नसल्याचे समीक्षण सांगतात गोविंदाग्रजांचा पिंड सामाजिक सुधारणेचा नाही. यात पुर्वजांच्या पराक्रमाचे गोडवे गात न बसता त्यापुढे जाण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. असे ते म्हणतात.

"जुन्या ऋषींना सलाम ठोकूनि
करा तयारी छाती ठोकूनि
आजकालच्या ऋषींमागुनी- जा तिकडे नेईलहा दसरा |"

किती वेळ पर्यंत आपण दलितांना वाईट वागणूक देणार आहोत. या प्रतिगाम्यांना माणूस मुल्य माहित नाही त्यांच्या मनात बालविधवा बाबत कोणताही दया भाव नाही या धर्माचे अवडंबर आपण जुगारले पाहिजे, एखाद्या व्यक्तीने आपल्या प्रकृतिच्या बाहेर जावून काव्य लेखन करावे असे या कवितेतून जाणवते, पण यातील प्रामाणिक तळमळ सच्चेपणा निश्चितच वाचकांना भावतो त्यामुळे ही कविता वरवरची वाटत नाही. त्यामुळे तुतारीचे अनुकरण करण्याच्या हेतूने ही कविता लिहली असे वाटत नाही.

राजहंस माझ निजलाही त्याची भावोत्कट कविता आहे. करूण रसाने ओथंबलेले हे काव्य आहे एका विधवेचा शोक पतिचे निधन झालेले आहे ज्याच्याकडे बघुन अश्रु पुसले त्या बाळाचा सुद्धा मृत्यू होतो. या कवितेत कलात्मकता आहे, भवनेला साद आहे एका मातेच्या दु:खाने वाचक हादरून जातो, सर्वत्र शोकमय वातावरण निर्माण होते.

मग मातापुत्रावरि त्या | तरू गाळाती कोमल पाने
ढाळीती लता निज सुमने | पशुपक्षीही रडती पाने
दशदिशा दगडही कढती | मत दुभंगुनी शकाने

या कवितेसारखी करून रसाने ओथंबलेली कविता केवळ गोविंदाग्रजा सारख्या प्रतिभेचे देणे् लाभलेला कवीच लिहू शकतो. ही कविता वाचल्यानंतर कुणाच्याही डोळ्याच्या कडा ओलावतात त्यामातेला पडलेला प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होतो

ज्यावेळला त्या मातेच्या मनातला भ्रम दुर होतो आपले मुल खरोखरच मरण पावले हे तिला कळते हे वास्तव ती स्विकारते हे असे जाहले म्हणता तरि देवचि निजला काही या प्रश्नाचे उत्तर कोणा जवळ नाही.

"कृष्णाकाठी कुंडल" ही शिवकालीन संदर्भ असलेली त्यांची कविता आहे. शिवाजी राजांच्या सैन्यातील शुर, स्वामिनिष्ठ त्यांचे मैना नावाच्या मुलीवर प्रेम होते. कृष्णेकाठी त्यांची भेट होते पुढे ते विवाह करतात, मैना त्याला सोबत घेवून जाण्याविषयी बोलते तेव्हा रया म्हणतो -

शिवराजाच्या शब्दासंद्ये नाचतसे तकदीर

दोरीपासवूनि तुटेला हा वाऱ्यावरचातीर

आम्ही शिवरायाचे शिपाई म्हणजे वाऱ्यावारच्या तीराप्रमाणे आहे. आमचे काही विशिष्ठ ठिकाण नाही, वाघ्या बरोबर वाघीण हिंडत नाहीत. राया पुढच्या कामगिरी साठी निघुन जातो, मैना दु:खी अंत:करणने त्याची वाट पाहात राहते, पुढे राया एका लढाईत कामी येतो, पतीच्या मृत्यूचा विलाप, करत मैना देखिल प्राण सोडते.

"मुरली" ही गोविंदाग्रजांची रसिक प्रिय कविता आहे, श्रीकृष्ण, त्याची मुरली हा कविचा आवडता विषय आहे. त्यामुळे गोविंदाग्रजांना याचे आकर्षण वाटावे हे स्वाभाविक आहे. ईश्वराच्या भेटीसाठी भक्ताची होणरी तगमग, कृष्णासाठी व्याकुळ झालेली राधा, प्रेम, भक्ती याचा मिलाप यात दिसतो.

पुष्पाविण येई वास

वाऱ्याविण चाले श्वास

हर्षाविण आता हास

मरणविण सुटाक झाली

मुरली या कवितेविषयी प्र. के. अत्रे म्हणतात,"मुरली गीतात गडकऱ्यांच्या "मुरली" सारखे् नादमधुर आणि हृदयसंगम गीत दुसरे नाही ते एक नितांत सुंदर रूपक आहे ईश्वरी साक्षात्कारासाठी भक्ताचे हृदय कसे तळमळते हे श्रीकृष्णाच्या मुरलध्वनी ऐकावयास आतूर झालेल्या राधेच्या व्याकुळ मानसिक अवस्थेचे भावपूर्ण चित्र रेखाटून गडकऱ्यांनी सांगितले आहे.

गोविंदाग्रजांची प्रेमकविता वैशिष्ट्यपुर्ण आहे. प्रेमात साफल्य वैफल्य या दोन गोष्टी महत्वपूर्ण असतात. त्यांच्या कवितेत वैफल्याची जाणीव तिव्रतेने होते. मराठी कवितेतील प्रेमाचे शाहीर त्यांना म्हटले गेलेले आहे. त्यांची कविता आणि त्यांचे वैयक्तिक आयुष्य याची सरमीसळ झालेली दिसते अनेकानी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात डोकावण्याचा प्रयत्न केला त्यांच्या विविध प्रेमकवितांचा संबंध त्यांचया वैयक्तिक जीवनाशी जोडण्याचा प्रयत्न केला, प्रमातील नैराश्य, तळमळ याचे वर्णन करतांना त्यांची कविता उत्कटतेचे शिखर गाठाते, प्राणाहूतीत खऱ्या अर्थाने प्रमाचे मर्म सापडते वृक्षाने आकाशतील विजे कडे पाहावे, ती त्याच्या मनात भरावी मनात प्रेम लहरी निर्माण व्हाव्या वृक्षाच्या अवस्थेचे वर्णण करतांना कवी म्हणतो.

"तो ठसा मनावर ठसला

तो घाव जिव्हारी बसला"

पण या प्रेमाच्या अंत सफल प्रेमात होणे अशक्य आहे, विरहामुळे त्यांची अवस्था बिकट व्हायला लागली, पाऊस पडूनही त्याला टवटवी येईना, वसंतऋतु येवूनही त्याच्यात कुठलाही फरक पडला नाही. इतरांचा तिरस्कार, अवहेलना याला त्याला समोरे जावे लागले, पण इष्काचा जहरी प्याल्याचे ज्याला आकर्षण आहे. त्याला इतर गोष्टीची तमा नसते देवाला सुद्धा इतर सुख समाधन न मागता, तीची भेट घडावी हीच मागणी केली, त्याला प्रेमाचा एक क्षणच महत्वाचा होता. मरणची त्याल तमा नव्हती.

निष्प्रेम चिरंजीवन ते

जगि दगडालाही मिळते || धिक तया ||

क्षण एक पुरे प्रेमाचा

"प्रेम आणि मरण" या कवितेत कविने शेवटी कवीतेचा सार सांगितला आहे.

प्रितीचा रोग | लागला ज्याला

लाभले मरणही त्याला ||

"अल्लड प्रेमास" ही गोविंदाग्रजांची असफल प्रेमाची व्यथा सांगणारी कविता आहे. वाग्वैजयंती ह्या काव्यसंग्रहातील महत्वाची कविता आहे, कवितेच्या सुरवातीला वेड्या मनाला थंबवितांना कवी म्हणतो.

क्षणभर वेड्या प्रेमा थांब |

अधिर मनासह जासी कोठे ?

चुकशिल-संकटि पडशिल वाटे

जग हे सारे बा रे खोटे |

प्रेमात माणूस अधिर होतो, भरावून, वस्तूस्थिचा फारसा विचार करत नाही, म्हणून प्रेम आंधळे असते असे बऱ्याचदा म्हटले, समोरच्या संकटाची त्याचा जाणीव नसते. पण गोविंदाग्रजांना प्रेमाचा आणि जगाचा चांगला अनुभव आहे. प्रेम किती कृत्रिम बनावट असते जग किती आपमतलबी असते याची त्यांना जाणीव आहे. म्हणून अविचाराने वागण्यापेक्षा स्वत:ची समजुत घालणे केव्हाही चांगले, प्रेम व्यक्त करण्याच्या भानगडीत न पडणे चांगले.

हृदया सोडूनि, गड्या म्हणोनी, जाई न कोठे लांब |

क्षणी पांढरा, क्षणीच काळा,

रंग आवडे असा जागाला

ठाव तयाचा कुणान कळला

जग प्रत्येक वेळी आपल्या सोई प्रमाणे वागते, त्यामुळे सरड्या प्रमाणे रंग बदलणाऱ्या माणसाचाच इथे टिकाव लागू शकतो निर्व्याज मनाने प्रेम करणऱ्याचा इथे निभाव लागत नाही. पुढे ते म्हणतात.

खुळ्या तुलाची अशाजगाची, कळेल का कृति सांग ?

जग सगळे हे देखव्याचे

गुलाम केवळ हे स्वार्थाचे |

स्मशान की हे शुद्धत्वाचे

शुद्ध भाबडें, सरळ रोकडे, अशांत करिशिल काय ?

केवळ स्वार्थाचा विचार करणारे हे जग चांगल्या गोष्टीसाठी स्मशानासारखे आहे त्यामुळे निष्कपट मनाने केलेल्या कृतीचा सुद्धा येथे मोठी किंमत चुकवावी लागते.

कोणी तुला मानिल खोटे

तिरस्कारहि दिसेल कोठे

अपमानाचे भय मोठे

निर्व्याज प्रेमाचा शेवट तिरस्कार, अपमान, अवहेलना इत्यादी होतो कारण, हे जग जरी वरून सुंदर बाग वाटत असले तरी गोविंदाग्रजांना यातील काट्यातीच जास्त ओरबडले आहे म्हणून ते म्हणतात.

बाग जगाची, ही न फुलांची कांटे जागोजागी

टाकिल कुणी तुच धिक्काराने,

रडविल किंवा उपहासाने

फसविल नकली की मालाने,

म्हणून प्रेम ही भावना व्यक्त न करता मनात ठेवण्यात शहाणपण आहे कुसंगतीहुन ऐकांत बरा असे कविला वाटते.

म्हणूनि लाडक्या | कुठे न जाई

या हृदयांतचि लपूनी राही

योग्य मित्र नच सुख तरि नाही |

कुसंगतीहुनि, वेड्या | मनी बरा एकान्त |

संदर्भ ग्रंथ -

१. काळे अक्षयकुमार (संपा) गोविंदाग्रज समीक्षा, अमेय प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती १९८५

२. इंगळे विजय - केशवसुत, गोविंदाग्रज, तांबे, श्री मंगेश प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती १९९७

३. भूगुवार सुरेश - गोविंदाग्रजांची शैली, साहित्य प्रसारकेंद्र सीताबर्डी, नागपूर प्रथामावृत्ती ९३

४. कुळकर्णी भीमराव - संपुर्ण गडकरी, सरिता पुणे १९८५ प्रकाशन

५. कुळकर्णी श्री. भा. हयशारदा व्हिनस पुणे १९७१